# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ३१६ - २३** **दिनांक : - १५/०९/२०२३**

## परराज्यातुन विक्रीकरीता आणलेला २०.०८० किलोग्रॅम वजनाचा ४,१४,९८०/- रुपये किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ बाळगणा-या आरोपीवर मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेची कारवाई.

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत वसई-विरार ,नालासोपारा परिसरात सकाळचे वेळेस परराज्यातुन आणलेल्या अंमली पदार्थांची खरेदी विक्री होत असल्याने अंमली पदार्थ खरेदी विक्री करणा-या इसमां विरुध्द माहिती प्राप्त करुन कारवाई करण्याबाबत वरिष्ठांनी मागदर्शन व आदेशीत केले होते.

दिनांक १३/०९/२०२३ रोजी मध्यवर्ती गुन्हे शाखेतील सपोनि नितीन बेंद्रे व स्टाफ हे विरार परिसरात गस्त करीत असताना विरार रेल्वे स्टेशन पश्चिमेस विरार बसडेपोकडे जाणा-या गावठाण रोडवर आले असता रस्तावर एक इसम पाठीवर दोन सॅगबॅगसह संशयास्पद स्थितीत उभा असल्याचे दिसले. त्याचे हालचालीवर संशय बळाविल्याने सापळा रचुन पोलीस पथकाने त्यास शिताफीने ताब्यात घेतले. ताब्यातील इसमास त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव संतोष रतन सिंग वय ४५ वर्षे, रा.रुम नं.११,प्लॉट नं ११२५, सिध्देश्वर को.ऑ.हौ.सोसायटी, सेक्टर २,सेंट रॉक शाळेजवळ, गोराई, मुंबई असे सांगितले.सदरबाबत वरीष्ठांना कळविल्यानंतर सदर इसमाची दोन पंचासमक्ष अंगझडती घेतली असता पाठीवर असलेल्या दोन सॅगबॅगमध्ये त्याचे कब्ज्यात २०.०८०किलोग्रॅम वजनाचा कॅनाबीस या वनस्पतीची शेंडे म्हणजे गांजा विक्री करीता बाळगला असता मिळुन आला असुन सदर अंमली पदार्थ पुढील कारवाई कामी जप्त करण्यात आला आहे. वर नमुद आरोपी विरुध्द पो.हवा.अनिल नागरे यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादी वरुन विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ८७९/२०२३ एन.डी.पी.एस कायदा १९८५ चे कलम कलम ८(क), २० (ब) ῗῗ (क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास विरार पोलीस ठाणे करीत आहे.

**सदरचा आरोपी हा रेकॉर्डवरील तडिपार गुन्हेगार असुन त्याचेविरुध्द यापुर्वी खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.**

१.विजयवाडा पो.स्टे. आंध्रप्रदेश राज्य गुन्हा.र.नं २१०/२०१७ भादवि कलम ३९५,३९७,३०७,३४२,४११,१२०ब सह भारतीय शस्त्र अधिनियम कलम २५,२७ प्रमाणे

२. विजयवाडा पो.स्टे. गुन्हा.र.नं २५८/२०१७ भादवि कलम ५०६, ३९२ प्रमाणे

३.बोरीवली पो.स्टे. गुन्हा र.नं ११९/२०११ भादवि कलम ४५२,३९७,३४,१२० ब प्रमाणे

४. .बोरीवली पो.स्टे. गुन्हा र.नं १२९/१९९८ भादवि कलम ३०७,३९९,३४ प्रमाणे

५. .बोरीवली पो.स्टे. गुन्हा र.नं ३२१/२००० भादवि कलम ३९९ सहभारतीय शस्त्र अधिनियम कलम २५,२७ प्रमाणे

६. .बोरीवली पो.स्टे. गुन्हा र.नं १५/१९९८ भादवि कलम ३२४,५०४,५०६,३४ प्रमाणे

७. .बोरीवली पो.स्टे. गुन्हा र.नं ३२३/१९९८ भादवि कलम३२४,३२६,४५२,३४ प्रमाणे

८. .बोरीवली पो.स्टे. गुन्हा र.नं ४३१/१९९८ भादवि कलम३२४, ३४ प्रमाणे

९. .बोरीवली पो.स्टे. गुन्हा र.नं ०४/२००१ भादवि कलम ३७९,३४ प्रमाणे

१०.कळवा पो. स्टे. गुन्हा र.नं १७/२००१ भादवि कलम ३०७,३९७,३५३ प्रमाणे

११.मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशन गुन्हा.र.नं १८९३/२०१८ भादवि कलम ३९२,५०४ प्रमाणे

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), व श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पो.नि.राहुल राख, स.पो.नि. नितीन बेंद्रे ,दत्तात्रय सरक, स.फौ.श्रीमंत जेधे, पो.हवा.शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, प्रविणराज पवार , राजाराम काळे , सतिश जगताप, अनिल नागरे,पो.अं. हनुमंत सुर्यवंशी व सफौ संतोष चव्हाण यांनी केलेली आहे.




**----0000----**